# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापंनि २०२३/प्र.क्र. ०६/का.०८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २० जुलै, २०२३

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी, (सर्व) (मुंबई शहर व मुंबई उपनगर)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब सादर करणेबाबत.

संदर्भ :- १.आयोगाचे क्र. एसईसी १०९५/१०१/डेस्क ३, दिनांक ०७ फेब्रुवारी १९९५ चे आदेश
२.आयोगाचे क्र. रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष
दि. १५/१०/२०१६, दि. २५/१०/२०१६, दि. ०२/०२/२०१७, दि.०७/०९/२०२१,
दि. २४/०१/२०२३ चे आदेश.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगामार्फत उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

२. आयोगाच्या दिनांक ०७/०२/१९९५ च्या आदेशानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारासह) केलेल्या खर्चाचा दैनंदिन तपशिल जोडपत्र २ मधील नमुन्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ३० दिवसाच्या निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरणपत्र (भाग १) शपथपत्रासह (जोडपत्र ३) सादर करणे आवश्यक आहे.

निवडणूक खर्चाचा दैनंदिन तपशिल जोडपत्र २, निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरणपत्र (भाग १) व शपथपत्र (जोडपत्र ३) संबंधित तहसिलदार/संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर केल्यानंतर त्यांच्याकडून पोच घेणे आवश्यक आहे.

३.	मात्र राज्य निवडणूक आयोगाकडे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम १४ (ब) (२) मधील तरतुदीनुसार प्राप्त होत असलेल्या विशेष अर्जामध्ये प्रामुख्याने खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत :-

१) उमेदवाराने तहसिलदार कार्यालयात / महानगरपालिका कार्यालयात खर्चाचा हिशोब सादर केल्यानंतर त्याची पोच उमेदवाराला तहसील कार्यालयाकडून / महानगरपालिका कार्यालयाकडून देण्यात येत नाही. ज्या मुळे खर्चाचा हिशोब सादर केल्याचे स्पष्ट होत नाही.

२) तहसिलदार कार्यालय / महानगरपालिका कार्यालय स्तरावरुन निवडणूक खर्च तपासण्यासाठी नेमण्यात आलेल्या पथकातील सदस्यांना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाची माहिती नसल्यामुळे माघार घेतलेल्या उमेदवारांनी देखील खर्चाचा हिशोब सादर केला नसल्यामुळे त्यांना अनर्ह करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

काही उमेदवार दोन किंवा त्यापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र भरतात परंतु एक जागा सोडून इतर जागोसाठी नामनिर्देशनपत्र मागे घेतात, अशा माघार घेतलेल्या जागांकरीता हिशोब सादर न केल्यास त्यांना विजयी झालेल्या जागेसाठी हिशोब सादर केल्यानंतर देखील त्यांना अनर्ह करण्यात येते.

३) तहसिलदार कार्यालयातून / महानगरपालिका कार्यालयातून जिल्हाधिकारी /विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवितांना त्यांच्या कार्यालयातील मूळ कागदपत्राची तपासणी न करताच नुसती एक यादी पाठविण्यात येते, जेणेकरुन चुकीचा प्रस्ताव जाण्याचे प्रमाण वाढले आहे.

४) जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त स्तरावरुन मूळ कागदपत्राची छाननी न करताच सरसकट उमेदवारांना अनर्ह करण्याचे आदेश पारीत करण्यात येतात.

५) उमेदवाराला अनर्ह करण्यापूर्वी त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी न देताच त्यांच्याविरोधात आदेश पारीत करण्यात येतात.

६) उमेदवाराने खर्चाचा हिशोब सादर करण्याच्या विलंबासाठी संयुक्तिक कारणमिमांसा दिल्यानंतर देखील सारासार विचार न करता (application of mind न करता) उमेदवाराला आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षासाठी अनर्ह करण्यात येत आहे.

४. उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवाराने खर्चाचा हिशोब सादर करणे व त्यासाठी तहसिलदार / जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त/ विभागीय आयुक्त कार्यालयाने करावयाच्या कार्यवाहीबाबत खालील निर्देश देण्यात येत आहेत:-

१) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी-

**१. निवडणूक खर्चाचा दैनंदिन तपशिल जोडपत्र २ मधील नमुन्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करावा.**

**२. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ३० दिवसापर्यंत निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरणपत्र (भाग १) तसेच**

**३. शपथपत्र (जोडपत्र ३) सादर करावे.**

२) **उमेदवाराने वरीलप्रमाणे खर्चाचा तपशिल सादर केल्यावर त्याला पोच देणे अनिवार्य असेल. उमेदवाराला पोच न दिल्यास संबंधित कार्यालय प्रमुख हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील.**

३) **संबंधित तहसिलदार/ महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांनी, उमेदवाराने निवडणूक खर्च सादर करताना संक्षिप्त विवरणपत्र (भाग १) तसेच शपथपत्र (जोडपत्र ३) सादर केले आहे किंवा कसे? याची खातरजमा करावी. संक्षिप्त विवरणपत्र (भाग १) व शपथपत्र (जोडपत्र ३) यापैकी काही दाखल केले नसल्यास, संबंधित उमेदवाराला त्याबाबत अवगत करावे व दोन्ही बाबी एकत्रितपणे विहित मुदतीत सादर करण्याबाबत कळवावे.**

४) जर निवडणूक खर्च तपासण्यासाठी नेमण्यात आलेले पथक कार्यरत असताना किंवा निवडणुकीनंतर त्याचा कार्यकाल संपल्यानंतरसुध्दा उमेदवाराने खर्चाचा हिशोब तहसिल/महानगरपालिका कार्यालयास सादर केल्यास त्याची नोंद कार्यालयाच्या नियमित आवक-जावक नोंदवहीमध्ये घेऊन असे कागदपत्र हे निवडणूक खर्च तपासणाऱ्या पथकाकडे/पथकाचा कार्यकाल संपला असल्यास पथक प्रमुखाकडे पाठविण्यात यावे. सदरची कागदपत्र पथक / पथक प्रमुखाकडे प्राप्त झाल्यानंतर त्याची नोंद पथक प्रमुखाने देखील त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी.

५) संबंधित उमेदवाराने जरी विलंबाने खर्चाचा हिशोब सादर केला, तरी तो स्विकारण्यात यावा व त्या उमेदवाराला पोच देऊन उमेदवाराने सादर केलेल्या हिशोबावर दिनांक टाकून स्वाक्षरी करण्यात यावी, जेणेकरुन विलंब किती झाला आहे हे कळेल.

६) उमेदवाराला अनर्ह करण्याचे प्रस्ताव सादर करताना तहसिलदार / महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांनी स्वत: केवळ लढविणाऱ्या उमेदवाराच्या (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारासह) निवडणूक खर्चाचा दैनंदिन तपशिल जोडपत्र २, निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरणपत्र (भाग १) व शपथपत्र (जोडपत्र ३) कागदपत्र तपासून प्रमाणित केल्यानंतरच उमेदवारास अनर्ह करण्याचे प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांच्याकडे पुढील ३० दिवसात ( निवडणूक निकाल लागल्यापासून ६० दिवसात )सादर करण्यात यावेत.

७) जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी अनर्हतेचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार / महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन त्यानंतरच संबंधित उमेदवाराला त्याचे म्हणणे मांडण्यासाठी संधी द्यावी.

८) जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त हे सदर अधिकार वापरत असताना अर्ध - न्यायिक (Quasi-Judicial) अधिकार वापरत असल्यामुळे त्यांनी नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन करणे (Principles of natural justice) अनिवार्य आहे.

९) संबंधित उमेदवाराने त्याचा खुलासा सादर केल्यानंतर जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी अनर्हतेसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे कमाल ३ महिन्यात घेणे आवश्यक आहे. सदर आदेश (Speaking Order) हे स्पष्ट कारणमिमांसासह असावेत.

तरी उपरोक्त निदेशांचे सर्व संबंधितांनी तंतोतंत पालन करावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

आपला,

( के. सूर्यकृष्णमूर्ती )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**पोचपावती**

दिनांक --------- रोजी --------------नगरपालिका / नगरपरिषद / जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक निवडणूक / पोटनिवडणूक मधील निकाल घोषित करण्यात आलेल्या प्रभाग /निर्वाचन गण / निवडणूक विभाग क्रमांक ---------------- मधील ------------------- (उमेदवाराचे नाव) यांच्या बाबतीतील निवडणूकविषयक खर्चाचा हिशोब त्यांनी / त्यांच्यावतीने दिनांक -------- रोजी सादर केला असून तो मला आज दिनांक ------ महिना ----- वर्ष ----------- रोजी मिळाला आहे.

नगरपालिका आयुक्त/महानगरपालिका आयुक्तांनी प्राधिकृत केलेला अधिकारी.
नगरपालिका/महानगरपालिका ------------

जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी
जिल्हा -------------

# जोडपत्र तीन

(शपथपत्राचा नमुना)

महानगरपालिका आयुक्त, ---------------------- / जिल्हाधिकारी-----------------यांच्यासमक्ष,

## शपथपत्र

मी, ------------ यांचा मुलगा / यांची मुलगी / पत्नी, वय ---------------वर्षे, राहणार --------- याद्वारे गांभीर्यपूर्वक व मन:पूर्वक पुढील गोष्टी जाहीरपणे नमूद करत आहे.

(१) मी, ------------------महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत, प्रभाग क्रमांक ---------------/ ---------------जिल्हापरिषद निवडणूक विभाग / पंचायत समिती निर्वाचन गण, क्रमांक ----------- -- / -----------------ग्रामपंचायत, प्रभाग क्रमांक  मधून सार्वत्रिक निवडणूक / पोटनिवडणूक लढविली आहे आणि तिचा निकाल दिनांक  ------------ रोजी घोषित झाला आहे.

(२) मी / माझ्या निवडणूक प्रतिनिधीने दिनांक ---------- ( ज्या दिनांकास मला निवडणुकीसाठी नामनिर्देशन करण्यात आले तो दिनांक) ते त्या निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात आला तो दिनांक ------------ दोन्ही दिवस धरुन यांच्या दरम्यानच्या कालावधीमध्ये वरील निवडणुकीच्या संबंधात मी किंवा माझ्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या किंवा अधिकृत मंजूरी दिलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व बिनचूक हिशोब ठेवला आहे.

(३) उक्त हिशोब राज्य निवडणूक आयोगाने या प्रयोजनार्थ तयार केलेल्या प्रपत्रामध्ये ठेवण्यात आला होता आणि उक्त हिशोबामध्ये नमूद केलेली प्रमाणके / देयके पुष्टयर्थ जोडून त्याची एक सत्यप्रत यासोबत जोडलेली आहे.

(४) सोबत जोडलेल्या माझ्या निवडणूक खर्चाच्या हिशोबामध्ये मी किंवा माझ्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या किंवा अधिकृत मंजुरी दिलेल्या खर्चाच्या सर्व बाबी समाविष्ट केल्या आहेत आणि त्यामधील कोणतीही बाब लपवण्यात आलेली नाही किंवा रोखून ठेवण्यात आलेली नाही / दाबून ठेवण्यात आलेली नाही.

(५) पूर्वगामी परिच्छेद (१) ते (४) यामध्ये केलेली विधाने माझ्या वैयक्तिक माहितीनुसार खरी आहेत, ती विधाने खोटी नाहीत आणि कोणतीही महत्वाची गोष्ट मी लपवून ठेवलेली नाही.

## अभिसाक्षी

माझ्या समक्ष दि. ---------- रोजी ---------- येथे ---------------यांना गांभीर्यपूर्वक तसेच शपथपूर्वक कथन केले.

| जोडपत्र - २ | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **निवडणूक खर्च सादर करण्यासंबंधीचा नमुना** | | | | | | | | | |
| उमेदवाराचे नाव | | | | | | | | | |
| ज्यांच्यातर्फे उमेदवार निवडणूक लढवित असेल त्या राजकीय पक्ष / आघाडी / फ्रंट यांचे नाव | | | | | | | | | |
| निवडणूक लढवित असलेला प्रभाग / निर्वाचन गण / निवडणूक विभाग : | | | | | | | | | |
| निवडणूक जाहीर झाल्याचा दिनांक : | | | | | | | | | |
| **दैनंदिन खर्च** | | | | | | | | | |
| खर्चाचा दिनांक | खर्चाचे स्वरुप | खर्चाची रक्कम | | प्रदानाची तारीख | आदात्याचे नाव व पत्ता | दिलेल्या रकमेच्या बाबतीत प्रमाणकाचा अ.क्र. | अदत्त रकमेच्या बाबतीत देयकचा अ.क्र. | अदत्त रक्कम ज्या व्यक्तीस देय आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता | शेरा |
| | | दिलेली | अदत्त | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| . | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येत आहे की, मी / माझ्या निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या लेख्यांची ही सत्यप्रत आहे

निवडणूक लढणाऱ्या उमेदवाराची स्वाक्षरी

## भाग - एक

### निवडणूकविषयक खर्चाचे संक्षिप्त विवरण

| अ. क्र | खर्चाची बाब | परिमाण/ संख्या | खर्च करणाऱ्या किंवा त्याला अधिकृत मंजूरी देणाऱ्या व्यक्तीचे / राजकीय पक्षाचे / सस्थेचे / संघाचे नाव | खर्चाची रक्कम | प्रदानाचा / प्रदानाचे दिनांक | प्रदानाची पध्दत | लेख्या सोबत जोडलेला प्रदानाचा पुरावा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | नामनिर्देशनपत्रावरील खर्च | | | | | | | |
| २ | प्रतिभूति ठेवीवरील खर्च | | | | | | | |
| ३ | मतदार याद्यांच्या प्रती खरेदी करण्यावरील खर्च | | | | | | | |
| ४ | प्रचार मोहिमांसाठी कार्यालये भाड्याने घेण्यावरील खर्च | | | | | | | |
| ५ | जाहीरनाम्यांच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ६ | व्यक्तिगत माहिती पत्रकांच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ७ | भित्तिपत्रकांच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ८ | हस्तपत्रकांच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ९ | भित्तीपत्रके चिकटवण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १० | हस्तपत्रकांचे वितरण करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| ११ | भिंतीवर निखाण करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १२ | जाहिराती प्रसिध्द करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १३ | सार्वजनिक सभांचा प्रचार करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १४ | सार्वजनिक सभांसाठी जागा भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १५ | सार्वजनिक सभांसाठी मंडप वगैरे गोष्टी भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १६ | सार्वजनिक सभांसाठी ध्वनिक्षेपक भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |

| अ. क्र | खर्चाची बाब | परिमाण/ संख्या | खर्च करणाऱ्या किंवा त्याला अधिकृत मंजूरी देणाऱ्या व्यक्तीचे / राजकीय पक्षाचे / सस्थेचे / संघाचे नाव | खर्चाची रक्कम | प्रदानाचा / प्रदानाचे दिनांक | प्रदानाची पध्दत | लेख्या सोबत जोडलेला प्रदानाचा पुरावा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १७ | सार्वजनिक सभांमध्ये छायाचित्रे काढण्यासाठी बोलाविलेल्या छायाचित्रकारांचा भाडे खर्च | | | | | | | |
| १८ | दृक्श्राव्य (AUDIO VISUAL)चित्रण करण्यासाठी व दाखविण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १९ | विशेष मान्यवर व्यक्तींच्या भेटी | | | | | | | |
| २० | दारे व कमानी उभारण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| २१ | उमेदवाराने वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २२ | निवडणूक प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २३ | मतदान प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २४ | मतमोजणी प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनाचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २५ | निवडणूक प्रतिनिधींना दिलेले पारिश्रामिक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २६ | मतदान प्रतिनिधींना दिलेले पारिश्रामिक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २७ | मतमोजणी प्रतिनिधींना दिलेले पारिश्रामिक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २८ | घरोघरी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलेले पारिश्रामिक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |

| अ. क्र | खर्चाची बाब | परिमाण/ संख्या | खर्च करणाऱ्या किंवा त्याला अधिकृत मंजूरी देणाऱ्या व्यक्तीचे / राजकीय पक्षाचे / सस्थेचे / संघाचे नाव | खर्चाची रक्कम | प्रदानाचा / प्रदानाचे दिनांक | प्रदानाची पध्दत | लेख्या सोबत जोडलेला प्रदानाचा पुरावा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २९ | पक्षाच्या मुख्यालयामध्ये जाण्यासाठी केलेल्या प्रवासावरील खर्च | | | | | | | |
| ३० | संकीर्ण खर्च (वर यादीमध्ये नमूद केलेल्या बाबींच्या व्यतिरिक्त) | | | | | | | |

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची स्वाक्षरी

टिप १) वर उल्लेखिलेल्या बाबी सर्व समाविष्ट नाहीत. त्यामुळे क्र.१ ते २९ बाबींव्यतिरिक्त करण्यात आलेला खर्च बाब क्र. ३० या सर्वसाधारण खर्चाचे अंतर्गत तपशीलवार देण्यात यावा.

२) **या प्रपत्रासोबत विहित नमुन्यातील शपथपत्र जोडणे आवश्यक आहे. शपथपत्राशिवाय असलेले खर्चाचे विवरणपत्र पूर्ण विवरणपत्र म्हणून स्वीकारण्यात येणार नाही.**

३) हिशोब निवडणूक प्रतिनिधीने दाखल केला असेल तर त्यावर उमेदवाराने प्रतिस्वाक्षरी करावी व निवडणूक प्रतिनिधींने ठेवलेल्या हिशोबाची सत्यप्रत आहे असे प्रमाणित करावे.

४) टपालखर्च, रेल्वे प्रवास अशाप्रकारची प्रमाणके सादर करणे व्यवहार्य नाही अशी प्रमाणके वगळता इतर सर्व खर्चाच्या बाबींची प्रमाणिके सादर करणे आवश्यक आहे.